**हुतात्मा सहकारी बँक लि., वाळवा, जि.सांगली**

**सायबर सिक्युरिटी बाबत घ्यावयाची दक्षता**

इलेक्ट्रिक माध्यमांचा वापर हा दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. देशामध्ये डिजीटल बँकिंग चा वापर वाढत आहे. त्याचबरोबर त्यामधील धोके पण वाढत आहेत. योग्य ती दक्षता घेऊन आपण हे धोके टाळू शकतो.

**मोबाईल बँकिंग अॅप्लिकेशन वारताना घ्यावयाची काळजी**

1. आपले युजर आयडी व पासवर्ड कोणासही शेअर करु नये.
2.आपले मोबाईल बँकिंग चा पासवर्ड ठराविक कालावधीने बदलावे.
3.पासवर्ड निवडताना कठीण पासवर्ड ठेवावा. पासवर्ड साठी आपली किंवा आपल्या नातेवाईक मित्र अशा कोणाची माहिती वापरू नका.
4.मोबाईल बँकिंग मधून आलेले ओटीपी कोणासही शेअर करु नका.
5.ट्रान्झॅक्शन पीन कोणासही शेअर करु नका व ट्रान्झॅक्शन पीन ठराविक कालावधीने बदलावे.
6.मोबाईल बँकिंग अॅप्लिकेशन लॉगीन करण्यासाठी मल्टि फॅक्टर ऑथेंटिकेशनचा वापर करा.
7.ज्यावेळी आपल्याला ट्रान्झॅक्शन अथवा मोबाईल बँकिंग अँप्लिकेशन वापरावयाचे नसेल तर ट्रान्झॅक्शन बंद करुन ठेवावे.
8.आपल्या मोबाईल वर ट्रस्टेड अँप्लिकेशन इन्स्टॉल करावे.
9. आपल्या मोबाईल वर अँटीव्हायरस चा वापर करावे.
10.अज्ञान व्यक्ती किंवा वेबसाईट वरुन आलेले दुरध्वनी कॉल अथवा ईमेल वरून आलेले कोणतेही मोबाईल अँप्लिकेशन डाउनलोड करु नका.
11.एसएमएस, ईमेल, सोशल अँप वरुन आलेले कोणतेही लिंक वर क्लीज करु नका.
12.सार्वजनिक वायफायचे वापर शक्यतो टाळावेत.
13.मोबाईल बँकिंग अँप्लिकेशन व एटीएम कार्ड इंटरनेट बँकिंग इ.चे पासवर्ड किंवा पीन ओटीपी इ.कोणालाही ईमेल अथवा कोणत्याही इतर स्त्रोताव्दारे पाठवू नये.
14.तुमचा पासवर्ड अथवा पीन ओटीपी ई.सार्वजिक ठिकाणी मोठ्याने बोलू नका जिथे लोक तुम्हाला एकू शकतील.
15.आपण केलेल्या ट्रान्झॅक्शन चे खात्री काही अकाउंट स्टेटमेंट मधून करुन घ्यावी तसेच काही विसंगती आढल्यास त्वरीत बँकेस कळवा.